# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

जा.क्र.आयएफएमएस/उअ/ड्रेनेज/तारापूर/B-96012 /१४
उप अभियंता यांचे कार्यालय,
मऔविम. ड्रेनेज उप विभाग,
तारापूर.
दिनांक :- 03 /०७ /२०१४

प्रति,
सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
मुंबई

**विषय :-** दिनांक २५/०६/२०१४ रोजीच्या बैठकिचा इतिवृतांत .

महोदय,

दिनांक २५/०६/२०१४ रोजी "औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती" ची पहिली बैठक अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), ता.पालघर, जि.ठाणे कार्यालयात घेण्यात आली. सदर बैठकिच्या इतिवृतांत आपल्या माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सदस्य सचिव
औद्योगिक वसाहत तारापूर
पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती तथा
उप अभियंता, मऔविम तारापूर

सोबत :- वरील प्रमाणे.

दिनांक:- ०३/०७/२०१४

**"औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती" च्या दिनांक २५/०६/२०१४ रोजीच्या बैठकिचा इतिवृत्तांत**

दिनांक २५/०६/२०१४ रोजी मा. अध्यक्ष, औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती तथा उप विभागिय अधिकारी (महसूल), ता. पालघर, जि. ठाणे यांनी औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समितीची पहिली बैठक उप विभागिय अधिकारी कार्यालय, पालघर येथे आयोजित केली होती. या बैठकीस उपस्थित सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

मा. अध्यक्षानी सदर समितीच्या सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन त्यांचा परिचय करुन दिला. बैठकीस उपस्थित नसलेले अशासकिय सदस्य, अध्यक्ष, नवापूर मच्छिमार विविध सहकारी संस्था मर्यादित, नवापूर यांच्या बद्दल विचारणा केली. तसेच त्याना पुढील बैठकित उपस्थित राहण्याबाबत पत्राने कळविण्याच्या सुचना मा. अध्यक्षांनी, सदस्य सचिंवाना देवून बैठकीस सुरुवात केली.

अध्यक्षानी सदर समितीच्या स्थापनेबाबत, तीच्या कार्यकक्षा व सदर समितीकडून कोणती कार्य अपेक्षित आहेत या बाबत चर्चा करण्यास प्रारंभ केला.

१) म.औ.वि. महामंडळ, तारापूर परिसर व सागरी किनारपट्टी येथील प्रदुषणांसंबंधीच्या तक्रारीचा आढावा/पाहणी करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे.

चर्चेत प्रथम उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, तारापूर यांनी एमआयडीसी, महाडच्या धर्तीवर तारापूर येथे पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती स्थापन करण्यासंबंधी मा. मंत्री, पर्यावरण व सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशाबद्दल माहिती दिली.

मा. अध्यक्षानी म.औ.वि. महामंडळ तारापूर परिसर व सागरी किनारपट्टी येथील प्रदूषणासंबंधी तक्रारीची विचारणा केली.

उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, तारापूर यांनी तारापूर परिसर व सागरी किनारपट्टीच्या प्रदूषणाबाबत आजपर्यंत मासे मरतूकीबाबत दोन तक्रारी आलेल्या होत्या व त्या वेळी म.प्र.नि. मंडळाने जागेवर प्रत्यक्ष पाहणीकरुन तेथील पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले व तक्रारीचे निरासरण करण्यांत आले असे कळविले. त्यावर अध्यक्षांनी अशा वेळी म.प्र.नि. मंडळ कोणावर व कश्या प्रकारे कार्यवाही करते या बाबत विचारणा केली असता उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ तारापूर यांनी औद्योगिक क्षेत्राची, म.प्र.नि.मंडळाचे कामाची पध्दत व कक्षाची संक्षिप्त माहिती दिली व तसेच औद्योगिक क्षेत्रात कंपन्याद्वारे निर्माण होणारे सांडपाणी त्यांना MPCB ने दिलेल्या consent नुसार प्रक्रियाकरुन म.औ.वि. महामंडळाच्या संकलन व्यवस्थेद्वारे एकत्रिक करुन पुढील प्रक्रियेसाठी M/s. TEPS यांच्याद्वारे चालवण्यात येणा-या CETP येथे आणण्यात येते व प्रक्रिया केल्यावर म.औ.वि. महामंडळाच्या सम्प-२ मधून पंपींग करुन नवापूर गावाजवळच्या समुद्रात सुमारे ५०० मीटर आत अंतरावर सोडले जाते. सदर प्रक्रियेमध्ये दोषी

आढळून आलेल्या कंपन्यावर म.प्र.नि. मंडळातर्फे Notice-३३ water pollution Act अंतर्गत कार्यवाही करुन यामध्ये कंपनीकडून Bank guarantee घेवून त्यांच्या प्रक्रिया करण्याच्या पध्दतीत सुधारणा करण्यास वेळ दिला जातो व त्या वेळेत पूर्तता केली नाही तर प्रदूषण मंडळ त्यांच्या bank guarantee जप्त करते.

मा. अध्यक्षानी या बाबत मत्स्य व्यवसाय विभागाकडे काही तक्रारी आहेत का? याची विचारण केली.

उप आयुक्त मत्स्य व्यवसाय यानी नवापूर गाव व परिसरात सुमारे ६ ते ७ कि.मी. परिसरात प्रदूषणामुळे समुद्राचे पाणी काळे पडले आहे व तेथील ग्रामस्थाना वासाचा खुप त्रास होत असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच मत्स व्यवसायिक, मासे मरतूकिबाबत तक्रारी करतात व परिसरातील लोकांचा शासनावर प्रदूषणामुळे खुप रोष आहे असे सांगितले.

TEPS चे श्री. राऊत यांनी अध्यक्षाना तारापूर औद्योगिक क्षेत्रात असलेल्या सर्व कंपन्याचे वर्गीकरण Red/Orange/Green अशा प्रकारे केले जाते व त्यांच्यातील Orange व Red consent असलेल्या व २५ m3 पेक्षा जास्त सांडपाणी निर्माण करण्या-या सर्व कंपन्याना सांडपाणी म. प्र. नि. मंडळाने ठरवून दिलेल्या (consent to operate) प्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते सोडणे बंधन कारक असते. तसेच या कंपन्याना स्वतःचा ETP बंधनकारक आहे. औद्योगिक क्षेत्रातील CETP ला सुध्दा म.प्र.नि. मंडळाच्या consent to operate प्रमाणेच प्रक्रिया करुन सांडपाणी महामंडळाच्या सम्प-२ मध्ये सोडण्यास परवानगी आहे. सद्यःस्थितीत तारापूर औद्योगिक क्षेत्रात व परिसरात प्रदूषणाच्या प्रश्नाचे मुख्य कारण, ओद्योगिक क्षेत्रात निर्माण होणारे सांडपाणी सुमारे ४० ते ४५ MLD असुन फक्त २५ MLD क्षमतेचा CETP आहे. या CETP ची क्षमता कमी पडत असल्यामुळे जवळपास १५ ते २० MLD सांडपाण्यावर CETP मध्ये प्रक्रिया केली जात नाही व सदरचे सांडपाणी विना प्रक्रिया करताच समुद्रात सोडण्यात येते. TEPS ला महामंडळाने ५० MLD इतक्या वाढीव क्षमतेचा CETP बांधण्यास जागा वाटप केलेली असुन, सप्टेंबर २०१४ अखेर येथे बांधकाम सुरु होणार आहे असे सांगितले. तद्नंतर अध्यक्षानी पुढील मुदयांवर चर्चा करण्यात सुरुवात केली.

सदस्य सचीव यांनी असे सांगितले कि, म.औ.वि. महामंडळाने तारापूर औद्योगिक क्षेत्रात शिवाजीनगर सम्प नं. २ ते लायका लॅब कंपनीपर्यंत ८०० मि.मि. व्यासाची HDPE सांडपाणी वाहिनी टाकण्याचे काम हाती घेतले आहे. सदर कामाचे स्वरुप हे जुनी लाईन जीर्ण झाल्यामुळे त्या बदली नवीन लाईल टाकणे हेच आहे. तथापि हे काम मच्छीमार संघटनेने बंद पाडले आहे. त्यांचे मता नुसार महामंडळ वाढीव लाईन टाकून जास्तीचे रासायनिक सांडपाणी समुद्रात सोडणार आहे. गेले दीड ते दोन महिन्यापासून हे काम बंद आहे. सदर काम हे तातडीने पूर्ण करणे गरजेचे आहे अन्यथा सदरच्या जुन्या वाहिनीतून रासायनिक सांडपाण्याची गळती होवून आपतकालीन परिस्थीती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२) उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी यांच्याकडून होणा-या प्रदूषण प्रतिबंधात्मक कारवाईचा आढावा घेऊन सुधारणा करण्याकरीता सुचना करणे.

या बाबतीत अध्यक्षानी सुचना केली की, पुढील बैठकीपुर्वी ओद्योगिक क्षेत्राची तसेच CETP, नवापूर गाव इ. ची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल. दरम्यान CETP च्या outlet वर तसेच कंपन्याच्या ETP च्या

outlet वर MPCB ने नियंत्रण ठेवावे व कोणी दोषी असल्यास त्यांच्यावर कार्यवाही करावी व हे समितीच्या निदर्शनास आणून दयावे असे सांगितले.

३) आपात्कालिन परिस्थितीमध्ये म.प्र.नि.मंडळाच्या मदतीने जल प्रदुषणा संबंधी पंचनामे करुन नमुने गोळा करणे, सदर नमुने संकलनाच्यावेळी उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी यांचे प्रतिनिधी व किमान दोन स्थानिक सदस्य उपस्थित असावेत.

मा. अध्यक्षानी आपतकालीन परिस्थिती कधी उद्‌भवली काय? या बाबत चौकशी केली. त्यावर उप अभियंता, मऔविम. तारापूर तथा सदस्य सचीव यांनी पाईप लाईन ब्रेकडाऊन होणे / सांडपाण्याचा वास येणे/ सांडपाण्याची COD/BOD निकषानुसार नसणे/ संम्प/ CETP ओव्हर फ्लो होणे अशा वेळी आपतकालीन परिस्थिती निर्माण होते. त्या वेळी म.प्र.नि. मंडळ, म.औ.वि. महामंडळ व CETP द्वारे तातडीने कार्यवाही केली जाते. या पुढे असे घडल्यास सदरची बाब तातडीने समितीच्या निदर्शनास आणण्यात येईल. अशा वेळी तेथील मातीचे/ सांडपाण्याचे नमुने गोळा करुन चाचणीसाठी प्रयोग शाळेत पाठविले जातील.

४) सदर नमुने समिती अध्यक्षांच्या मान्यतेने शासनाचा अथवा शासनमान्य प्रयोगशाळेत पृथःकरणासाठी पाठविण्यात यावेत याची संपूर्ण कार्यवाही उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र,नि.मंडळ यांनी करावयाची आहे. या करीता येणारा खर्च सीईटीपी व्यवस्थापनाकडून देय असेल.
आपतकालीन परिस्थिती उदभवली, मासे मरतूकी झाली तर अशा सांडपाण्याचे नमुने म.प्र.नि.मंडळाने घेवून आवश्यकता असेल तर माशाचे नमुने घेवून ते शासनमान्य प्रयोग शाळेत पृथ्थःकरणासाठी पाठवावेत व त्यासाठीचा खर्च CETP व्यवस्थापनाकडून घेण्यात यावा. असे अध्यक्षानी सुचविले. तसेच उप आयुक्त, मत्स व्यवसाय यानी सुध्दा या बाबत म.प्र.नि.मंडळाकडे माशांचे नमुने गोळा करुन देण्याची कार्यवाही करावी असे सांगितले.

५) तारापूर एमआयडीसीतील जल प्रदुषणामुळे नैसर्गिक जलस्त्रोत शेती, मत्स्य व्यवसाय इ. वर विपरित परिणाम झाल्यामुळे येणा-या तक्रारी, वर्तमानपत्र, दूरचित्रवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातम्याच्या अनुषंगाने, सदरील ठिकाणी संबंधित विभागामार्फत भेटी देण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीच्या अभिप्रायासह सविस्तर अहवाल गठित केलेल्या समितीचे अध्यक्ष व उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ तारापूर यांच्याकडे पाठविण्यात यावा.
या बाबत अध्यक्षानी असे सांगितले की, तारापूर औद्योगिक क्षेत्रात व परिसरात प्रदूषणाबाबत काहि तक्रारी, बातम्या, टि.व्ही., रेडियो व वर्तमान पत्रात आल्या तर त्यावर सर्व कार्यालयाने त्यांच्यातर्फे तातडीने कार्यवाही करावी व या समितीस त्यांचा अहवाल अभिप्रायासह व कार्यवाहीसह दयावा.

६) मासे मर्तुकीबाबतच्या प्राप्त तक्रारी प्रसंगी संबंधित विभागाच्या स्थानिक अधिका-यांनी समिती अध्यक्षांच्या निर्देशानुसार नमुने गोळा करुन, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ तारापूर यांच्याकडे पाठवावेत. सदर नमुने परिक्षण अहवाल प्रादेशिक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, ठाणे यांचेकडून प्राप्त करुन घेऊन सदर अहवाल समिती अध्यक्ष यांचेकडे पाठविण्यात यावा.

या बाबत मत्स्य व्यवसाय विभागाने पुढाकार घेवून, मेलेल्या मास्यांचे नमुने घेवून, म.प्र.नि.मंडळाकडे पुढील कार्यवाहीसाठी दयावेत. म.प्र.नि.मंडळाने सदर नमुन्याच्या पृथ्थ:करणाचा अहवाल समितीच्या पुढे मांडावा.

७) तारापूर एमआयडीसी व परिसरात अनधिकृतरित्या घातक घनकचरा टाकत असल्याचे आढळल्यास म.प्र.नि.मंडळाच्या स्थानिक कार्यालयास अवगत करणे.
अध्यक्षानी या बाबत विचारणा केली असता श्री. राऊत यानी सांगितले कि, सर्व कंपन्यामध्ये निर्माण होणारा औद्योगिक घातक घनकचरा (Industrial Hazardous Solid) MPCB च्या निर्देशानुसार मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड (MWML) तळोजा येथे पाठवला जातो. सदया सीईटिपी मध्ये दर महिन्यास ३०० MT घनकचरा तळोजा येथे पाठवला जातो व त्या करिता मोठया प्रमाणावर CETP द्वारे खर्च केला जातो. तारापूर औद्योगिक क्षेत्राच्या आजुबाजुच्या गावात मोठया प्रमाणावर शहरीकरण झाल्यामुळे तेथील ग्रामपंचायतीद्वारे घरगुती घनकचरा जमा करुन तो औद्योगिक क्षेत्रात जेथे मोकळी जागा आहे तेथे टाकतात. त्यामुळे या कच-याची विल्हेवाट लावणे हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. जो पर्यंत या बाबत मऔवि महामंडळ / शासन ग्राम पंचायतीस जागा उपलब्ध करुन देत नाही तो पर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. त्यावर उप अभियंता, मऔविम तथा सदस्य सचीव यांनी असे सांगितले कि, सदर
घनकच-या करिता जागा वाटप करणे हा प्रश्न महामंडळाच्या विचाराधीन असून, त्यावर जो निर्णय होईल त्या प्रमाणे अमलबजावणी करण्यांत येईल.

८) खाडीतील पाण्याचे नमुने सहा महिन्यातुन किमान एक वेळ घेऊन म.प्र.नि.मंडळाकडे सुपूर्द करुन आवश्यक उपाय योजना सुचविणे.
म.प्र.नि. मंडळ नियमितपणे पाण्याचे नमुने घेत असते. या पुढे सदर नमुन्याचे अहवाल समितीपुढे वेळोवेळी सादर केले जातील असे सांगितले.

९) एमआयडीसी व परिसरातील पर्यावरण संवर्धनाबाबत उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी, म.प्र.नि.मंडळ यांच्या सहकार्याने अंमलबजावणीकरीता विशेष प्रकल्प सुचविणे.
या बाबत अध्यक्षांनी संबंधितांनी योग्य ती कार्यवाही तातडीने करावी व अहवाल समितीस सादर करावा असे सांगितले.

१०) समितीच्या बैठकीचा अहवाल शिफारशीसह प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, ठाणे यांना तीन दिवसांत पाठविणे.
या बाबत अध्यक्षांनी संबंधितांनी योग्य ती कार्यवाही तातडीने करावी व अहवाल समितीस सादर करावा असे सांगितले.

११) सदर प्राप्त अहवालावर प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांच्यातर्फे पुढील ७ दिवसांत कारवाई करणे.
या बाबत अध्यक्षांनी संबंधितांनी योग्य ती कार्यवाही तातडीने करावी व अहवाल समितीस सादर करावा असे सांगितले.

१२) प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, ठाणे सदर समितीच्या भेटीचा व कारवाईचा अहवाल म.प्र.नि.मंडळाच्या संकेतस्थळावर ठेवणे.

या बाबत अध्यक्षांनी संबंधितांनी योग्य ती कार्यवाही तातडीने करावी व अहवाल समितीस सादर करावा असे सांगितले.

१३) सदर समिती आदेशाच्या दिनांका पासुन एक वर्षासाठी कार्यरत राहिल. सतिमीची कालमर्यादा वाढविणे अथवा पुर्नगठित करण्याचे सर्वाधिकार **"सदस्य सचिव"** म.प्र.नि.मंडळ, मुंबई यांचेकडे राहतील.

या बाबत अध्यक्षांनी, संबंधितांनी समितीच्या कार्याचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करावा व पुढे मुदत संपल्यावर शासनास कळवावे असे सुचविले. तसेच म.प्र.नि.मंडळाचे सदस्य सचिव यांनाही इतिवृत्ताची एक प्रत माहितीसाठी पाठविण्यात यावी असे सुचित करण्यात आले.

शेवटी अध्यक्षानी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

03/10

सदस्य सचिव
औद्योगिक वसाहत तारापूर
पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती, तारापूर

आज दि. 25/6/2014 रोजी औद्योगिक वसाहत, तारापूर

~~बोईसर~~ पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती "ची सभा आयोजीत केली होती त्या सभेस खालील नमुद केलेले अधिकारी व सभासद उपस्थित होते.

| ~~अनु~~ क्र | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | सही |
|---|---|---|---|
| १ | शिवाजी दावभट | SDO & SDM Palghar. | [signature] |
| 2 | श्री आर. बि. वायडा | सहा. आयुक्त मत्स्य. वसई (पालघर) | [signature] |
| 2. | सं. श. मोमले | उप. प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, तारापूर-१ | [signature] |
| 3 | सं. सं. ननवरे | उप. अभियंता (अकार्यकारी) मऔविम, तारापूर | [signature] 25/06 |
| ४ | दि. के. राऊत | अध्यक्ष टीमा तारापूर | [signature] 25/6 |
| ५ | ग्रामनाथ जिवाजी | Director TEPS | [signature] |
| ६) | नं. म. करवा | उप. अभियंता मऔविम | [signature] करवा |
| ७) | ग. सी. जाधव | मॅनेजर, TEPS | [signature] |
| ८) | हेमंत व. कुलकर्णी | क्षेत्र अधिकारी, म.प्र. नि. मंडळ तारापूर | [signature] |
| ९ | सुरेश उगले | सी.अ. मऔविम. तारापूर | उगले |